# पूर आणि दुष्काळ

## भारतीय कथा



# पूर आणि दुष्काळ

## भारतीय कथा



मराठी : अश्विनी बर्वे



जुन्या काळची गोष्ट आहे. राजाला हत्तीसाठी प्रशिक्षकाची खूप गरज होती. राजाने प्रशिक्षकाला मोठं इनाम देण्याचे वचन दिले होते. राजा प्रशिक्षकाच्या मदतीने आपल्या बिघडलेल्या दोन हत्तींना प्रशिक्षित करू इच्छित होता.



एक दिवस, एक योग्य प्रशिक्षक महालात आला आणि त्याने नोकरी मागितली.





राजा स्वतः प्रशिक्षकाला हत्तींना भेटायला घेवून गेला. “एकाचं नाव आहे पूर” आणि दुसऱ्याचे नाव आहे “दुष्काळ” राजा म्हणाला.
“किती विचित्र नाव आहे,” प्रशिक्षक म्हणाला, “मला आश्चर्य वाटतं त्यांना ही नावं का दिली असतील?”
प्रशिक्षकाला खरी गोष्ट समजण्यासाठी फार काळ वाट पहावी लागली नाही.



एका हत्तीने राजाच्या पोहण्याच्या तलावात उडी मारली. त्याने त्यात मस्त अंघोळ केली आणि त्याने थेंब उडवले. जो कोणी त्याच्या जवळून जाईल त्याच्या अंगावर पाण्याचे फव्वारे उडवत होता.
"अच्छा,“ प्रशिक्षक म्हणाला. “हा नक्की ‘पूर’ असला पाहिजे.





मग दुसऱ्या हत्तीने राज्याच्या केळाच्या झाडावर हात मारला. त्याने झाडावरचे एकूण एक फळ खाल्लं.
“तो हत्ती फार हावरट आहे.” रजा ओरडला. “तो दिवसभर खाण्याशिवाय काहीच काम करत नाही. “असं वाटतं की एक दिवस तो आमच्या घरातील सगळ्या वस्तू खाऊन टाकेल.”  “अच्छा” प्रशिक्षकाने विचार केला, “हा हत्ती नक्कीच ‘दुष्काळ’ असेल.



त्या हत्तींना एका कठोर प्रशिक्षणाची गरज होती. म्हणून तो प्रशिक्षक त्वरित कामाला लागला. त्याने त्यांच्याकडून खूप मेहनत करून घेतली.





रोज सूर्य उगवल्या पासून ते सूर्यास्त होईपर्यंत त्या हत्तींनी काम केलं. त्यांनी वस्तूंना धक्का दिला आणि त्या ओढल्या. त्यांनी जड सामान इकडून तिकडे वाहिलं. त्यांनी इतर हत्तींच्या मानाने दुप्पट काम केलं.



दिवसाच्या शेवटी दोन्ही हत्ती थकून एकदम मलूल होवून जात असत. थकल्यामुळे 'दुष्काळ'च्या घशाखाली घास उतरत नसे.तो फक्त त्याचं डोकं हलवत असे.

"पूर" एवढा थकून जाई की राज्याच्या तळ्याची गोष्ट दूरच त्याला अंघोळ करण्याचं सुद्धा सुचत नसे. प्रशिक्षकाला राजानं बक्षीस दिलं, खरोखरच राजाने त्याला दुप्पट इनाम दिलं.



आता महालात सगळीकडे शांतता होती. सगळा माहोल खूपच शांतीपूर्ण होता. सगळीकडे शांत-शांत होतं.



पण आता जुन्या काळाची मजा संपली होती.





लोक जुन्या काळाबद्दल विचार करू लागले, ते दिवस आठवू लागले. ते त्या दिवसाच्या कहाण्या ऐकवू लागले. त्यांनी तो काळ आठवला जेव्हा 'पूर' ने राजाच्या पत्नीला आश्चर्यचकित केलं होतं आणि जेव्हा 'दुष्काळ' राजाच्या पार्टीत घुसला होता.



एवढंच नाही तर राजा सुद्धा यावर गंभीरपणे विचार करू लागला. त्याने आपल्या मुलांचा विचार केला. आधी त्याची मुलं किती खुश होते. आठवून राजा हसला. मग त्याच्या लक्षात आलं की काय करायला हवं.



त्याने प्रशिक्षकाला फोन केला, “ताबडतोब ‘पूर’ आणि ‘दुष्काळ’चे प्रशिक्षण बदल आणि त्यांना आधी सारखं कर,” राजा म्हणाला.

“त्यांना आधी सारखं करू?” प्रशिक्षकाने विचारलं.

“हो, त्यांना प्रशिक्षण देवून आधी सारखं कर,” राजा म्हणाला.





प्रशिक्षकाला जसं सांगितलं होतं तसं त्यानं केलं. एकदा परत महालतल्या जीवनात रंग भरला गेला. आता तिथं परत आरडा-ओरडा होवू लागला. आता तिथं घाण पण साचली. हे एक आश्चर्य आणि मुर्खपणाही होता.





पण सगळ्यात भारी म्हणजे ते मोठं मजेशीर होतं.



समाप्त